# वाचनसंस्कृतीच्या समृद्धीसाठी ग्रंथालयाची भूमिका महत्त्वाची

**- मनीषा शेणई**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांचा वाचनाकडील ओढा कमी होत चालला आहे; 'मात्र अशा परिस्थितीत ही वाचनसंस्कृती टिकवून ठेवून समृद्ध करण्यामध्ये ग्रंथालयांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन करवीर नगर वाचन मंदिरच्या ग्रंथपाल मनीषा शेणई यांनी केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांमधील वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यामधील ग्रंथालयाची भूमिका हा विषय होता.

मनीषा शेणई म्हणाल्या, वाचनामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना चालना मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भता लाभते. सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये परीक्षार्थी न होता ज्ञानार्थी बनले पाहिजे. ग्रंथ हे आपले मित्र असून ग्रंथालये ज्ञानमंदिरे आहेत. डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, ग्रंथालयामधील ग्रंथसंग्रह अद्ययावत असलाच पाहिजे; पण त्याचबरोबर ग्रंथपाल, ग्रंथालयातील सेवकही तत्पर असले पाहिजेत. यावेळी प्राचार्य जे. बी. पाटील, ग्रंथपाल ऊर्मिला कदम यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक नीता धुमाळ यांनी केले, तर आभार रेखा पंडित यांनी मानले.



**कोल्हापूर : कमला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानप्रसंगी प्रमुख वक्त्या मनीषा शेणई यांचे स्वागत करताना प्राचार्य क्रांतिकुमार पाटील. सोबत ऊर्मिला कदम, प्राचार्य जे. बी. पाटील.**